सत्यमेव जयते

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/जिपपंस/२०११/प्र.क्र.१९/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ०८/०२/२०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर, मुंबई उपनगर, धुळे, नंदुरबार,
अकोला, वाशिम, भंडारा व गोंदिया वगळून)

विषय :- जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०१२ मतदान प्रक्रिया पूर्ण झालेल्या क्षेत्रातील आचारसंहिता शिथिल करणेबाबत.

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने दि. ३/१/२०१२ च्या पत्रान्वये राज्यातील २७ जिल्हा परिषदा व ३०९ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमानुसार मतदानाचा दिनांक ७/२/२०१२ व मतमोजणीचा दिनांक ८/२/२०१२ असा निश्चित करण्यात आला होता. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची आचारसंहिता दि.८/२/२०१२ पर्यंत लागू रहाणार होती. मात्र त्यानंतर गडचिरोली जिल्ह्यातील ४ तालुक्यांमधील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक दि. १२ फेब्रुवारी, २०१२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आयोगाच्या दि. ४/२/२०१२ च्या पत्रान्वये उपरोक्त सर्व जिल्ह्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची मतमोजणी महानगरपालिकांच्या मतमोजणी बरोबरच दि. १७/२/२०१२ रोजी घेण्यात यावी असे आदेशित करण्यात आले आहे. त्यामुळे या निवडणुकीची आचारसंहिता आता दिनांक- १७/२/२०१२ पर्यंत लागू राहणार आहे.

आचारसंहितेच्या कालावधीत धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत, नवीन विकास कामे सुरू करता येत नाहीत. मात्र आता आर्थिक वर्ष संपत आले असल्याने तसेच बहुतांशी क्षेत्रामधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने आचारसंहिता काही प्रमाणात शिथिल करण्यात यावी अशी आयोगाकडे मागणी करण्यात येत आहे.

वरील परिस्थितीत मतदान व मतमोजणीमध्ये बराच कालावधी असल्याने ज्या क्षेत्रातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे तेथील आचारसंहिता काही प्रमाणात शिथिल करण्यात येत आहे. आचारसंहिता शिथिल केल्याच्या कालावधीत मंजूर झालेल्या योजना कार्यान्वित करणे, निविदा प्रक्रिया सुरू करणे, कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सुरू करणे याबाबतची कार्यवाही सुरू करता येईल. मात्र राज्यातील १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झालेला असल्याने या महानगरपालिकांच्या मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येणार नाहीत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. सर्व विभागीय आयुक्त
७. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्या-७)